बदली आदेशामध्ये अंशत: बदल करणेबाबत
महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक
संवर्ग

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन आदेश क्रमांक :- संकीर्ण 2018/प्र.क्र.93/ कोषा प्रशा-2
मंत्रालय,मुंबई-400032, दिनांक :- 4 जून, 2018.

वाचा :-वित्त विभाग,शासन आदेश, क्र.संलेको 2018/ प्र.क्र. 68 /कोषा प्रशा-2, दि.16 मे, 2018

**-: शासन आदेश :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील अधिका-यांच्या संदर्भाधीन आदेशान्वये सर्वसाधारण बदल्या करण्यात आल्या आहेत. सदर बदली आदेशातील अ.क्र. 18 येथील श्री. रत्नराज रामचंद्र जवळगेकर, उपसंचालक (प्रणाली विश्लेषण), राज्य देखभाल अभिकरण, मुंबई शहर यांची खालील विवरणपत्रामध्ये नमूद स्तंभ क्र. 3 मध्ये नमूद पदावर बदली करण्यात आली होती. श्री.जवळगेकर यांच्या विनंतीनुसार त्यांच्या बदलीच्या पदस्थापनेमध्ये अंशत: बदल करून, त्यांना स्तंभ क्र. 4 मध्ये नमूद पदावर अंशत: बदलाने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नाव | दि. 16 मे, 2018 च्या आदेशान्वये बदली करण्यात आलेले पद व ठिकाण | अंशत: बदलाने दिलेले पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | श्री. रत्नराज रामचंद्र जवळगेकर | उपअधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर |

2. श्री. जवळगेकर यांना अंशत: बदलाच्या पदावर हजर होण्याकारी त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे.

3. श्री. जवळगेकर यांनी कार्यमुक्त झाल्यानंतर अंशत: बदलाच्या पदावर तात्काळ हजर व्हावे. अंशत: बदलाच्या पदावर हजर होताच संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई व शासनास अवगत करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शुभांगी शेठ)
सहसचिव, वित्त विभाग.

प्रति,
1) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.

2) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*

3) महालेखापाल -1/ 2 (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.*

4) मा. मुख्यमंत्री / मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

5) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख*

6) संबंधित अधिकाऱ्याला अंशत: बदलाने पदस्थापना दिलेल्या कार्यालयाचे प्रमुख.

7) संबंधित अधिकारी*

8) निवडनस्ती कोषा प्रशा- 1 व 2 वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(संचालक, ले व को, संचालनालय, मुंबई यांचेमार्फत)